MHAU070065002025

नियमीत दिवाणी दावा क्र.८२०/२०२५
**कार्तीक लबडे Vs. देवीदास व अन्य इतर**
नि.क्र.१४ वरील आदेश

प्रस्तुतचा अर्ज हा प्रतिवादी क्र. १ व २ यांनी त्यांच्या विरुध्द पारित करण्यात आलेला 'एक तर्फा आदेश' बाजूस सारुन मिळणेसाठी दाखल केलेला आहे.

२ प्रस्तुत अर्जाद्वारे प्रतिवादींनी असे कथन केले आहे की, दाव्यातील समन्सची बजावणी होऊन देखील ते नेमलेल्या तारखेस न्यायालयात गैरहजर राहिले. सबब दि. १४.०१.२०२६ रोजी त्यांच्या विरुध्द प्रकरण एक तर्फा चालवण्याचा आदेश परित करण्यात आला. प्रतिवादी हे मागील काळात बाहेरगावी त्याचे महत्वाचे कामा निमीत्त गेलेले असल्यामुळे सदर प्रकरणात हजर राहु शकले नाही.त्यामुळे त्यांच्या विरुध्द एक तर्फा आदेश परित करण्यात आला. प्रतिवादीं विरुध्द परित करण्यात आलेला एकतर्फा आदेश बाजुस सारणे आवश्यक आहे. सदर आदेश बाजुस सारुन न घेतल्यास प्रतिवादींचे कधीही न भरुन येणारे नुकसान होईल. सबब सदर आदेश बाजूस सारुन मिळणेसाठी प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे.

वादीचा लेखी जबाब

३. वादीने सदर अर्जावर नि.क्र.१५ अन्वये म्हणणे दाखल केले आहे. वादीचे असे कथन आहे की, प्रतिवादी क्र. १ व २ हे मुददाम पुर्वीच्या तारखेस नोटीस बजावणी होऊन देखील न्यायालयात हजर झालेले नाहीत. आज रोजी प्रकरण नि.क्र. ५ च्या युक्तीवादासाठी आहे. केवळ नि.क्र. ५ चा युक्तीवाद लांबवण्याच्या हेतुने प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे. त्यामुळे सदरचा अर्ज नामंजुर करण्याची विनंती वादीने केली आहे.

४. दोन्ही विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला.

५. प्रस्तुत प्रकरणाच्या ई-अभिलेखाचे अवलोकन केले असता असे निदर्शनास येते की, दिनांक १४/०१/२०२६ रोजी प्रतिवादीं विरुध्द दावा एकतर्फा चालवण्याचा आदेश परित करण्यात आलेला आहे. प्रस्तुतचा अर्ज आज दि. २१.०१.२०२६ रोजी देण्यात आलेला आहे. याचाच अर्थ प्रतिवादीं विरुध्द एकतर्फा आदेश परित केल्यानंतर सुमारे सात दिवसांनी प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे. विलंबाचे कोणतेही योग्य ते स्पष्टीकरण पटलावर नाही. प्रतिवादी हे त्याचे महत्वाचे कामानिम्मीत

बाहेरगावी गेलेले असल्यामुळे सदर प्रकरणात हजर नसल्याचे प्रतिवादींचे कथन आहे. मात्र त्याच्या कथनास पुष्टी देणारा कोणतेही कागदपत्रे पटलावर नाही. मात्र प्रतिवादीं विरुध्द पारित करण्यात आलेला एक तर्फा आदेश बाजुस सारुन न घेतलयास त्याचा बचाव पटलावर येणार नाही व दाव्याचा निर्णय गुणांवर होणार नाही. सबब दाव्याचा निर्णय गुणांवर होण्याकरता प्रतिवादी विरुध्द पारित केलेला एक तर्फा ओदश बाजुस सारणे आवश्यक आहे. विलंबाचे योग्य ते स्पष्टणीकरण पटलावर नसल्याने त्यांना खालील प्रमाणे कॉस्ट करणे उचित होईल असे माझे मत आहे.  सबब खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येतो.

<u>आदेश</u>

१. अर्ज  रक्कम रुपये १०० रुपये कॉस्टवर मंजूर करण्यात येतो.

२. प्रतिवादी क्र. १ व २ यांच्या विरुध्द पारित करण्यात आलेला दि. १४.०१.२०२६ रोजीचा एकतर्फा आदेश बाजुस सारण्यात येतो.

३. उपरोक्त कॉस्ट प्रतिवादींनी वादीस दयावी.

४. दोन्ही विधीज्ञांनी आदेशाची नोंद घ्यावी.

Digitally signed by ROHIT NANDKISHOR PATHAK
Date: 2026.01.22 11:31:11 -0100

दि. २१/०१/२०२६

(आर.एन. पाठक )
सह दिवाणी न्यायाधीश, (व.स्तर),
गंगापुर

# CERTIFICATE

I affirm that, the contents of this PDF file Judgment are same, word to word as per the original Order.

| | |
|---|---|
| Name of the Stenographer | : Balu Ashruba Age<br>Stenographer Grade 2 |
| Court | : CJSD Court, Gangapur. |
| Judgment date | : 21/01/2026 |
| Judgment signed by the Presiding Officer on | : 21/01/2026 |
| Judgment uploaded on | : 22/01/2026 |